॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

## DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT

Phone : (02462) 215525
Fax : (02462) 215572

Website: srtmun.ac.in
E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२३-२४/ ३५७

दिनांक: - ०४/०३/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये, नांदेड
जिल्हा नांदेड.

विषय:- मतदार जागृती उपक्रमांसंदर्भात आंतरवासिता (इंटर्नशिप) शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ :- १) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.७६६/२२/३३ दि.०६.०२.२०२४

२) मा. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रं. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.७६६/२३/३३ दि.१६.०२.२०२४

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने संदर्भिय पत्रानुसार मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने महाविद्यालयीन विद्याथ्यर्थ्यांना मतदार जागृती उपक्रमामध्ये सहभागी करुन घेण्याचे ठरवले आहे. युवा वर्गाच्या सहभागामुळे कोणत्याही कार्यात चैतन्य, उत्साहाचे वातावरण निर्माण होते. एप्रिल २०२४ च्या लोकसभा निवडणूकीसंदर्भात असेच वातावरण निर्माण करण्यासाठी दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी आंतरवासिता (इंटर्नशिप) शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक अभ्यासक्रमांतही आंतरवासिताचे अनन्यसाधारण महत्व आहे, त्याअतर्गत विद्यार्थ्यांना निवडणूक, मतदान प्रक्रिया, मतदार जागृती या गोष्टींचा जवळून अनुभव घेता येईल. तसेच युवा वर्गाचा मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मतदार जागृती उपक्रमांतील विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सदर आंतरवासितामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ई-मेलद्वारे जिल्हास्तरीय स्वीप कक्षाकडे पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

(सोबत:- संदर्भिय पत्र व शासन निर्णयाची प्रत.)

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत माहितीस्तव:
श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्सपर्ट (संगणक विभाग) यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर ठेवण्यात यावे.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.७६६/२३/३३,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई – ४०००३२
ई-मेल : ceo_maharashtra@eci.gov.in
दिनांक – १६ फेब्रुवारी २०२४

प्रति,

सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
महाराष्ट्र.

**विषय : मतदार जागृती उपक्रमांसंदर्भात आंतरवासिता (इंटर्नशिप) शासननिर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत.**

सस्नेह नमस्कार,

युवा वर्गाच्या सहभागामुळे कोणत्याही कार्यात चैतन्य, उत्साहाचे वातावरण निर्माण होते. एप्रिल २०२४च्या लोकसभा निवडणुकीसंदर्भात असेच वातावरण निर्माण करण्यासाठी आमच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदार जागृती उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याचे ठरवले आहे. त्यासाठी दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी आंतरवासिता (इंटर्नशिप) शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक अभ्यासक्रमांतही आंतरवासिताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यांतर्गत विद्यार्थ्यांना निवडणूक, मतदान प्रक्रिया, मतदार जागृती या गोष्टींचा जवळून अनुभव घेता येईल.

तसेच युवा वर्गाचा मतदानाचा टक्का वाढवण्यासाठीही मतदार जागृती उपक्रमांतील विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर सदर शासननिर्णय महाराष्ट्रातील सर्व कृषी, अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयांना पाठवण्यात यावा आणि त्यांना सदर आंतरवासितामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करावे ही विनंती!

आपला स्नेहांकित,

(श्रीकांत देशपांडे)
अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी

सोबत – आंतरवासिता (इंटर्नशिप) शासननिर्णय

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
## (SVEEP शाखा)

ई-मेल आय.डी. : sveeploksabhaelectionned2024@gmail.com

जा.क्र.लोस/सा.नि.-२०२४/ ११ दिनांक:- २८/०२/२०२४

"निवडणूक प्राधान्य"

प्रति,
मा.कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

**विषय :- मतदार जागृती उपक्रमांसंदर्भात आंतरवासिता (इंटर्नशिप) शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ :- १) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, यांचे शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०२२/प्र.क्रं.७६६/२२/३३ दि.०६.०२.२०२४

२) मा.अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रं.संकीर्ण-२०२२/प्र.क्रं.७६६/२३/३३ दि.१६.०२.२०२४

**महोदय,**

उपरोक्त विषयी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने संदर्भिय पत्रानुसार मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदार जागृती उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेण्याचे ठरवले आहे. युवा वर्गाच्या सहभागामुळे कोणत्याही कार्यात चैतन्य, उत्साहाचे वातावरण निर्माण होते. एप्रिल २०२४ च्या लोकसभा निवडणूकीसंदर्भात असेच वातावरण निर्माण करण्यासाठी दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी आंतरवासिंता (इंटर्नशिप) शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक अभ्यासक्रमांतही आंतरवासिताचे अनन्यसाधारण महत्व आहे, त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना निवडणूक, मतदान प्रक्रिया, मतदार जागृती या गोष्टींचा जवळून अनुभव घेता येईल.

तसेच युवा वर्गाचा मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मतदार जागृती उपक्रमांतील विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्वपुर्ण ठरणार आहे. या पाश्वभुमीवर सदर शासन निर्णय विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांना पाठविण्यात यावा व त्यांना सदर आंतरवासितामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करावे तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ई-मेलद्वारे जिल्हास्तरीय स्वीप कक्षाकडे पाठवावा, ही विनंती.

**(सोबत:- संदर्भिय पत्र व शासन निर्णयाची प्रत.)**

आपला विश्वासू,

**(डॉ.पंजाब खानसोळे)**
उपायुक्त (महसुल), नां.वा.श.म.न.पा. नांदेड.
तथा नोडल अधिकारी (स्वीप कक्ष)

प्रत :-

१) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा.उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव.

**पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता- मतदार मित्र आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रम व त्यांतर्गत विद्यार्थ्यांच्या निवडीचे निकष, अटी, शर्ती आणि अंमलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.७६६/२२/३३,**
६ वा मजला, मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक - ०६ फेब्रुवारी, २०२४

**प्रस्तावना :-**

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र हे भारत निवडणूक आयोगांतर्गत कारर्यत असलेले कार्यालय आहे. मतदार नोंदणी करणे आणि विधानसभा, लोकसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणुका घेणे हे या कार्यालयाचे मुख्य कार्य आहे. तसेच या कार्यालयामार्फत -मतदारांचे पद्धतीशीर शिक्षण आणि निवडणुकीतील सहभाग (Systemetic Voters◦ Education & Electoral Participation - SVEEP) हा मतदार जागृतीचा कार्यक्रम राबवला जातो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये आंतरवासिता (इंटर्नशिप) हा महत्त्वाचा भाग असून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये आंतरवासिता (इंटर्नशिप) लागू करण्यात आली आहे. आंतरवासिता (इंटर्नशिप) ही विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये व्यावहारिक कौशल्ये विकसित करून शासकीय यंत्रणेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याची संधी आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे समूह काम, लोकांमध्ये जाऊन काम करणे, शासकीय कामातील समस्या, अडचणी आणि त्या सोडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना यांची विद्यार्थ्यांना माहिती मिळते.

आंतरवासित (इंटर्न) मतदार जागृतीचे उपक्रम राबविण्यासाठी नवनवीन कल्पना व दृष्टिकोन आणू शकतात, त्यामुळे लोक नैतिक व माहितीपूर्ण पद्धतीने मताधिकार बजावण्यास प्रोत्साहित होऊ शकतात. लोकजागृतीच्या या विविध उपक्रमांचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करण्याच्या कार्यात आंतरवासित (इंटर्न) सहभागी करून घेण्यासाठी हे आंतरवासिता धोरण मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून राबविण्यात बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय आणि जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत मतदारांचे पध्दतशीर शिक्षण आणि निवडणुकीतील सहभाग (Systematic Voters Education & Electoral Participation- SVEEP) या उपक्रमातून मतदार जागृतीचे कार्यक्रम राबविताना पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांचे निर्देश आहेत. याकरीता महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता - मतदार मित्र आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रमास मान्यता देण्यात येत आहे.

**१. उद्दिष्टे :-**

अ. युवकांना मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हाधिकारी कार्यालयांसोबत काम करण्याची संधी देऊन त्यांच्या कौशल्याचा विकास करणे.

आ. निवडणूक कार्यालयांतर्गत कार्यप्रणालीची माहिती देणे.

इ. तरुणांमधील नेतृत्व गुणांचा विकास करणे.

ई. -मतदार मित्र॰ उपक्रमांतर्गत मतदारांना नैतिक व माहितीपूर्ण पद्धतीने मताधिकार बजावण्यास प्रोत्साहित करणे.

उ. विविध सामाजिक संस्थांच्या आणि महाविद्यालयांच्या सहकार्याने मतदार जागृतीचे कार्यक्रम राबवणे.

**२. विद्यार्थ्यांच्या निवडीसंदर्भातील निकष :-**

अ. अर्जदार हा महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या महाविद्यालयामधून कोणत्याही विषयात पदवी (प्रथम/द्वितीय/तृतीय) किंवा पदव्युत्तर (प्रथम/ द्वितीय) शिक्षण घेणारा असावा.

आ. आंतरवासिताच्या संपूर्ण कालावधीत विद्यार्थ्याने पूर्णवेळ उपस्थित राहावे. तसेच या कालावधीत विद्यार्थ्याला इतर कोणतेही व्यावसायिक काम करता येणार नाही.

इ. लोकांशी संवाद साधणे, समूहामध्ये काम करणे, कार्यक्रम आयोजित करणे यांची विद्यार्थ्याला आवड असावी.

ई. महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या किंवा इतर व्यासपीठाच्या दहा ते पंधरा विद्यार्थ्यांच्या पथनाट्य समूहाला (ग्रूपला) प्राधान्य.

उ. पथनाट्य समूहातील प्रत्येक विद्यार्थ्याने सोबत दिलेला अर्ज भरणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जासोबत समूहातील सर्व विद्यार्थ्यांच्या नावांची यादी जोडावी.

३. **आंतरवासिता कालावधी :-** किमान तीन महिने. तसेच सदर शासनिर्णयातील नियमांआधारे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र यांच्याकडून वेळोवेळी इंटर्नशिपचा कालावधी जाहीर केला जाईल.

४. **आंतरवासिता ठिकाण :-**

अ. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मंत्रालय, मुंबई (उपक्रम मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्ह्यांत घेण्यात येतील).

आ. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा निवडणूक कार्यालये (उपक्रम त्या-त्या जिल्ह्यांतर्गत घेण्यात येतील)

५. **मानधन :-** सदर आंतरवासिता कालावधीत कोणत्याही स्वरूपाचे मानधन दिले जाणार नाही.

६. **अर्ज करण्याची पद्धत :-** विद्यार्थ्यांनी इंटर्नशिपचे अर्ज संबंधित महाविद्यालयाकडे किंवा विद्यापीठाच्या विभागाकडे सोबत जोडलेल्या नमुन्यात करावयाचा आहे. महाविद्यालयाने किंवा विद्यापीठाच्या विभागाने त्यांना प्राप्त झालेल्या अर्जांपैकी जास्तीत-जास्त २० अर्ज democracybook२०२२@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवणे आवश्यक आहे.

७. **निवडीसंदर्भातील कार्यवाही :-** विद्यार्थ्यांचे अर्ज मागवणे, अर्जांची छाननी करणे, विद्यार्थ्यांची निवड करणे, या सर्व बाबी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र / जिल्हा निवडणूक कार्यालय यांच्याकडून पार पाडण्यात येतील.

८. **आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रमाची रूपरेषा :-**

अ. मतदार नोंदणी शिबिरे राबवणे.

आ. मतदार जागृती कार्यक्रम (.मतदारांच्या भेटी इ ,पथनाट्य) - महाविद्यालयांच्या पथनाट्य गटाशी, सामाजिक संस्थांशी स्मन्वय साधणे.

इ. समाजमाध्यमांसाठी विविध पोस्ट तयार करणे - पथनाट्य सादरीकरण, घरभेटी हे उपक्रम आणि तृतीयपंथी समुदाय, दिव्यांग व्यक्ती, नवमतदार यांविषयी नावीन्यपूर्ण व्हिडिओ, पोस्ट तयार करणे.

ई. महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांच्याशी समन्वय साधणे.

उ. जिल्हा निवडणूक कार्यालयांशी समन्वय साधणे.

ऊ. निवडणुकीच्या काळात स्वयंसेवक म्हणून जबाबदारी पार पाडणे.

९. **नियुक्ती :-** निवड झालेल्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची नियुक्ती मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी करतील.

**१०.कार्य अहवाल :-** आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रम समाप्तीच्या अंतिम आठवड्यात प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांला प्रशिक्षणाबाबतचा अहवाल मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाला सादर करावा लागेल.

**११.प्रमाणपत्र :-** विद्यार्थ्यांनी आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रम समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र / जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्यात येईल.

**१२.आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रम रद्द करण्याचा अधिकार :-** आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रम रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचे सर्वस्वी अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचा राहील.

**१३.विद्यार्थ्यांच्या निवडीच्या अनुषंगाने विहित करण्यात येत असलेल्या अटी व शर्ती :-**

अ. विद्यार्थ्यांना प्रवास व निवसाची सोय स्वतः करावी लागेल.

आ. निवड झाल्याचे पत्र मिळाल्यानंतर, निर्देशित केलेल्या ठिकाणी व विहित मुदतीत विद्यार्थ्यास स्वखर्चाने हजर व्हावे लागेल.

इ. आंतरवासिता उपक्रमांतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कार्यालयातील सर्व नियमांचे पालन करून निर्धारित वेळेनुसार कार्यालयात उपस्थित राहावे लागेल.

ई. मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांचे नियम पाळणे बंधनकारक राहील.

उ. निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधित अधिकाऱ्यांवर निवडीसाठी कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.

ऊ. आंतरवासिता उपक्रमाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना तातपुरते प्रवेशपत्र देण्यात येईल व आंतरवासिता कालावधी संपल्यानंतर सदर प्रवेशपत्र कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

ऋ. काही अपरिहार्य कारणामुळे आंतरवासिता उपक्रम पूर्ण करणे शक्य न झाल्यास संबंधित विद्यार्थ्याने मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाला लेखी पूर्वसूचना देणे आवश्यक राहील.

ऌ. गैरशिस्तीच्या कारणामुळे एखाद्या विद्यार्थ्याची आंतरवासिता रद्द करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.

ए. प्रत्येक विद्यार्थ्याने आंतरवासिता उपक्रमादरम्यान केलेल्या कामकाजाचे विवरण तसेच त्यातून ज्ञात झालेल्या माहितीबाबत दैनंदिनीत नोंद ठेवणे आवश्यक राहील.

ऐ. आंतरवासिता उपक्रमाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचा राहील.

ओ. प्रकल्पाच्या कामादरम्यान निर्माण केलेले व्हिडिओ, पोस्ट, अहवाल किंवा इतर साहित्यनिर्मिती यांवर मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचा अधिकार असेल.

औ. आंतरवासित मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रसारमाध्यमांशी किंवा समाजमाध्यमांशी संवाद साधू शकणार नाही.

अं. आंतरवासिता म्हणजे निवडणूक कार्यालयातील रोजगाराची हमी नाही.

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व), कुलगुरु सर्व अकृषी विद्यापीठे (महाराष्ट्र), कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे (महाराष्ट्र), संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर शासन निर्णय त्यांचे अधिनस्त सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांमार्फत पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२०६१५५४०६९७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

मा.राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by MANOHAR RAMCHANDRA PARKAR
Date: 2024.02.06 15:54:42 +05'30'

**( मनोहर पारकर )**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व).
४. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे (महाराष्ट्र).
५. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे (महाराष्ट्र).
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) निवडनस्ती (कार्या.३३) मुंबई.

**CHIEF ELECTORAL OFFICER, MAHARASHTRA**

**ROOM NO. 624, 6th FLOOR, MANTRALAYA (ANNEX BUILDING), MUMBAI - 400032**

**APPLICATION FORM FOR 'MATDAR MITRA' INTERNSHIP SCHEME**

| | | |
|---|---|---|
| 1 | Full Name of the Applicant (in capital letters) पूर्ण नाव | |
| 2 | Mother's Name – आईचे नाव | |
| 3 | Address for Correspondence – सध्याचा पत्ता | |
| 4 | Mobile No – भ्रमणध्वनी क्रमांक | |
| 5 | Email ID – ई-पत्ता | |
| 6 | Date of Birth - जन्मतारीख | |
| 7 | Sex - लिंग | |
| 8 | Name of the University/Institution/ College (Bona-Fide Certificate to be enclosed) | |
| 9 | Course presently pursuing and year | |
| 10 | Educational Qualification – शैक्षणिक पात्रता | |

| Sr. No | Educational Qualification | Name of the Board | Examination Passed and Year of Examination Passed | Division with Percentage | Subjects/ Specializa -tion |
|---|---|---|---|---|---|
| (a) | Matriculation (SSC) | | | | |
| (b) | Intermediate (HSC) | | | | |
| (c) | Graduation | | | | |
| (d) | Post-Graduation | | | | |
| (e) | Other Qualification | | | | |

| | | |
|---|---|---|
| 11 | Why do you want to join this Internship (not exceeding 100 words) – आंतवासिता उपक्रमात का सहभागी व्हावे वाटते (१०० पेक्षा कमी शब्दांत) | |

---

Duly typed application form shall be forwarded to the Office of Chief Electoral Officer, Maharashtra, Room no. 624, 6th Floor, Mantralaya (Annex Building), Mumbai 400032 or email to democracybook2022@gmail.com